नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


# प्रेस नोट

दिनांक 20/01/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

## जबर दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 5 कि. मी अंतरावर मौजा खानगाव येथे दिनांक 19/01/2021 चे 18:00 वा. ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– किशोर रामदास चापके, वय 29 वर्ष, रा. खानगाव, ता. काटोल हा गणेश बोटरे याच्या किराणा दुकानासमोर उभा आसता आरोपी नामे– सागर प्रकाशराव मडावी, वय 19 वर्ष, रा. खानगाव याने फिर्यादीला धक्का दिला. फियादीने आरोपीला म्हटले की, ''मला धक्का का मारला'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीस शिविगाळ करून उजव्या हातातील लोखंडी कडयाने डोक्यावर मारले त्यामुळे फिर्यादीचे डोक फुटून रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ जवाहर चव्हान मो नं 9545363121 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील नागपूर ते सावनेर रोड नांदा गावाजवळ येथे दिनांक 15/01/2021 चे 21:30 वा. दरम्यान नागो विठठल मेघरासे( मृतक ), वय 35 वर्ष, रा. जुना नांदा हे आपल्या एमएच– 40/ बीक्यु– 7376 क्रमांकाच्या होडा शाहीन सीडी मोटरसायकलने नागपुर कडुन घरी जात असतांना कोराडी तलावा जवळ पुलीया जवळ अज्ञात वाहनाचे चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरदाव वेगाने चालवुन नागो मेघरासे याचे मोटरसायकला धडक दिल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नावेद खान 8208511663 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावरील मौजा हेटी शिवार उमरेड नागपूर रोड येथे दिनांक 18/01/2021 चे 20:00 वा. ते 20.30 वा. दरम्यान एमएच– 31/एफसी– 3581 क्रमांकाचा आयसर ट्रक गडचिरोली कडून नागपूरला जात असतांना समोरुन येणारा अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवून आयसर गाडीला समोरुन धडक दिली. या अपघातात आयसर गाडीत बसलेले मोतीराम उईके जखमी होउन मरन पावले व चालक सारंग लोही हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शुभम ज्ञानेश्वर उईके, वय 26 वर्ष, रा तोंडाखैरी तह. कळमेश्वर जि नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरुन जयसिंगपूरे मो नं 9049175485 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर